सन २०२५-२६ चे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड प्रक्रियेसाठी राज्य निवड समितीवर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असलेल्या दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- पीटीसी-२०२६/प्र.क्र.४६(क)/टीएनटी-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ ऑगस्ट, २०२६

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक:- पीटीसी -२०२२/प्र.क्र.३४/टीएनटी-४,दिनांक १६ जुलै, २०२५.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचे पत्र क्र. शि.सं. / राशिपु / रा.नि.स. / अशासकीय सदस्य /२०२५-२६/ अ-२/ विद्याशाखा, दिनांक २१ जुलै, २०२६.

प्रस्तावना :-

शासन निर्णय क्रमांक:-पीटीसी-२०२२/प्र.क्र.३४/टीएनटी-४,दिनांक १६ जुलै, २०२५ मधील परिच्छेद ६ अन्वये सन २०२५-२६ चे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराच्या अंतिम निवड प्रक्रियेसाठी राज्य निवड समितीचे गठण करण्यात आले आहे. राज्य निवड समितीच्या रचनेतील अ.क्र.६ प्रमाणे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असलेले शासन नियुक्त दोन प्रतिनिधी सदस्य म्हणून नियुक्त करावयाचे आहेत.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचा वाचा येथील २ अन्वये सन २०२५-२६ चे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड प्रक्रियेसाठी राज्य निवड समितीवर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असलेल्या दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

शासन निर्णय :-

सन २०२५-२६ चे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड प्रक्रियेसाठी राज्य निवड समितीवर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असलेल्या खालील दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	अशासकीय सदस्यांचे नाव	पदनाम
१	श्री.रमेश डी. देशपांडे, उपप्राचार्य, भवन्स महाविद्यालय, अंधेरी.	सदस्य
२	श्री. शिरसाठ शिवाजी भागुजी, (सेवानिवृत्त) मु.पो. पिंपळगाव बहुला, ता.जि. नाशिक.	सदस्य

२. शासन निर्णय क्रमांक:-पीटीसी-२०२२/प्र.क्र.३४/टीएनटी-४, दिनांक १६ जुलै, २०२५ मधील परिच्छेद ६ अन्वये गठित करण्यात आलेल्या राज्य निवड समितीतील अ.क्र.१,२,३,४,५ व ७ हे शासकीय सदस्य असल्याने त्यांची राज्य निवड समितीच्या कामकाजासाठी प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याची देयके, त्यांच्या वेतन व भत्त्याची देयके ज्या लेखाशिर्षाखाली काढली जातात त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

अ.क्र.६ येथील अशासकीय सदस्यांना राज्य निवड समितीच्या कामकाजासाठी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता/नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या दराने देण्यात यावा. मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. या सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्त्याचा खर्च "मागणी क्र. ई-२,२२०२ सर्वसाधारण शिक्षण ८०, सर्वसाधारण ००१,संचालन व प्रशासन (००)(००)(०१) शिक्षण संचालक (२२०२ १०९१) ११, देशांतर्गत प्रवास खर्च (दत्तमत)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ च्या मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. अशासकीय सदस्यांची देयके शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून अदा केली जातील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१११९०३३०१४४९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

GOVIND BALU KAMBLE

Digitally signed by GOVIND BALU KAMBLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=9197de2bc674839ebe310a15d6bce1dd2d80cb5d5cef5d d249d0ff0f60e4de9d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=06B02F2B563D12C922A0A07840D85D1C274F6150 8E2C94E450344568CFDBE0F5, cn=GOVIND BALU KAMBLE
Date: 2026.08.11 19:04:50 +05'30'

(गोविंद कांबळे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक ((माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) संचालक(महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती)),पुणे.
६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे .
७) श्री.रमेश डी. देशपांडे, उपप्राचार्य, भवन्स महाविद्यालय, अंधेरी यांना शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेमार्फत.
८) श्री. शिरसाठ शिवाजी भागुजी, मु.पो. पिंपळगाव बहुला, ता.जि. नाशिक यांना शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेमार्फत.
९) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
१०) प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (टीएनटी- ४)